**मेट्रो लाईन-३ करिता आरे कॉलनीतील ३ हेक्टर जागा मुंबई मेट्रो रेल कॉर्पोरेशन लि. यांना हस्तांतरित करण्यासाठी महसुल व वन विभागास प्रत्यार्पित करण्याबाबत.**

**महाराष्ट्र शासन**
**कृषी, पशुसंवर्धन, दुग्धव्यवसाय विकास व मत्स्यव्यवसाय विभाग**
**शासन निर्णय क्रमांकः एएमसी-२०१४/प्र.क्र.५४/पदुम-१०**
मादाम कामा रोड, हुतात्मा राजगुरू चौक,
मुंबई-४०० ०३२.
तारीख : १६ मार्च, २०१६.

**वाचा :**

1. **शासन ज्ञापन क्र.एएमसी-२०१२/प्र.क्र.१९४/पदुम-१०, दि.०१/०२/२०१३**
2. **मुंबई मेट्रो रेल कॉर्पोरेशन लि. यांचे क्र.मुं.मे.रे.कॉ.लि./मेट्रो लाईन-३/२४४/२०१६, दि.१७/०२/२०१६.**

**प्रस्तावना :**

मुंबई मेट्रो लाईन-३ या प्रकल्पाकरीता संदर्भ क्र.१ येथे नमूद ज्ञापनाद्वारेआरे दुग्ध वसाहतीमधील मौजे परजापूर येथील ३० हेक्टर जमीन मुंबई महानगर प्रदेश विकास प्राधिकरणास हस्तांतरीत करण्याकरीता महसुल व वन विभागाकडे प्रत्यार्पित करण्यात आली आहे. सदर जागेव्यतिरिक्त केंद्र व राज्यशासन यांच्यावर प्रकल्पाचा बोझा न टाकणे तसेच मालमत्ता विकसनाद्वारे निधी उभारण्याच्या अनुषंगाने सार्वजनिक गुंतवणूक मंडळाच्या दि.२५/०३/२०१३ रोजी झालेल्या बैठकीत ठरल्यानुसार वरील ३० हेक्टर जागेव्यतिरिक्त ३ हेक्टर जागा मेट्रो कार डेपो वर्कशॉप वापर व वाणिज्य वापराकरिता मुंबई महानगर प्रदेश विकास प्राधिकरणानास हस्तांतरित करावी अशी विनंती नगर विकास विभागामार्फत करण्यात आली. मा.मुख्यमंत्री महोदयांच्या अध्यक्षतेखाली दि.०३/०२/२०१६ रोजी झालेल्या बैठकीत आरे कॉलनी येथील मेट्रो लाईन ३ करिता मेट्रो रेल कॉर्पोरेशन लि. यांनी मागणी केलेली ३ हेक्टर जमीन महसुल विभागाकडे हस्तांतरित करण्यास पदुम विभागाने तत्वत: मान्यता देवून सदर जमिनीचा प्रत्यक्ष ताबा सदर जागेवरील आर.एम.सी. प्लँन्ट ची मुदत संपुष्ठात आल्यावर मे, २०१६ मध्ये द्यावा, असा निर्णय घेण्यात आला. सदर निर्णयानुसार आरे येथील न.भू.क्र.१२ (भाग) आणि १३ (भाग) येथील ३ हेक्टर इतकी जमिन मुंबई मेट्रो रेल कॉर्पोरेशनला हस्तांतरित करण्यासाठी सदर जमिन महसुल व वन विभागाकडे प्रत्यार्पित करण्यास तत्वत: मान्यता देण्याची बाब शासनाच्या विचाराधीन होती.

**शासन निर्णय :**

शासन या निर्णयान्वये, आरे येथील न.भू.क्र.१२ (भाग) आणि १३ (भाग) येथील ३ हेक्टर जमीन मुंबई मेट्रो रेल कॉर्पोरेशन लि. यांना हस्तांतरण करण्याकरीता महसुल व वन विभागाकडे प्रत्यार्पित करण्यास खालील अटींच्या अधीन राहून तत्वत: मान्यता देत आहे.

१) सदर जमिनीचे हस्तांतरण, मुंबई येथील आरे परिसराचे क्षेत्र वने म्हणून घोषित करणे व संजय गांधी राष्ट्रीय उद्यान सभोवताली पर्यावरण संवेदनशील क्षेत्र घोषित करणे यासंदर्भात मा. राष्ट्रीय हरित न्यायाधिकरण यांच्यासमोर दाखल असलेला अर्ज क्र.३४/२०१५ (वनशक्ती व इतर विरूध्द भारत सरकार व इतर) या प्रकरणी मा. न्यायाधिकरणाने दिलेल्या निर्णयाचा अधीन राहिल.

२) उपरोक्त प्रमाणे उपलब्ध होणाऱ्या ३ हेक्टर जमिनीवरील आरक्षण बदलणे अथवा तेथे वाणिज्य वापर अनुज्ञेय करणे याबाबतचा निर्णय नगर विकास विभागाने घेणे आवश्यक राहील.

सदर शासन निर्णय महाराष्ट्र शासनाच्या www.maharashtra.gov.in या संकेतस्थळावर उपलब्ध करण्यात आला असून त्याचा संकेताक २०१६०३१६१६००१६५४०१ असा आहे. हा आदेश डिजीटल स्वाक्षरीने साक्षांकित करुन काढण्यात येत आहे.

महाराष्ट्राचे राज्यपाल यांच्या आदेशानुसार व नावाने.

Rajesh Shaligram Govil

Digitally signed by Rajesh Shaligram Govil
DN: c=IN, o=Government Of Maharashtra, ou=Under Secretary, postalCode=400032, st=Maharashtra, 2.5.4.20=c549410b2251df8c92783a2da17afcacbe7f8fe3a4fd88f156fea84433871f11, cn=Rajesh Shaligram Govil
Date: 2016.03.16 16:02:50 +05'30'

**( राजेश गोविल )**
अवर सचिव, महाराष्ट्र शासन

**प्रत,**

१. मा. राज्यपाल महाराष्ट्र राज्य यांचे प्रधान सचिव.
२. मा.मुख्यमंत्री, महाराष्ट्र राज्य यांचे प्रधान सचिव.
३. प्रधान सचिव, महसुल व वन विभाग, मंत्रालय, मुंबई
४. प्रधान सचिव (नवि-१), नगर विकास विभाग, मंत्रालय, मुंबई-३२.
५. संचालक, मुंबई मेट्रो रेल कॉर्पोरेशन, लि., एमएमआरडीए बिल्डींग, बांद्रा-कुर्ला संकुल, मुंबई-४०० ०५१.
६. आयुक्त, दुग्धव्यवसाय विकास विभाग, वरळी, मुंबई-४०० ०१८
७. अतिरिक्त महानगर आयुक्त व प्रकल्प संचालक, मुंबई महानगर प्रदेश प्राधिकरण, बांद्रा-कुर्ला संकुल, बांद्रा (पूर्व), मुंबई-४०० ०५१.
८. जिल्हाधिकारी, उपनगर जिल्हा, बांद्रा, मुंबई-४०० ०५१.
९. मुख्य कार्यकारी अधिकारी, आरे दुग्धवसाहत, गोरेगांव (पूर्व), मुंबई-६५.
१०.निवड नस्ती पदुम-१०.